**महाराष्ट्र शासन**

**सहसंचालक ( उच्च शिक्षण ) नागपूर विभाग,नागपूर**

तपासणी सूचीप्रमाणे प्राचार्य यांनी करावयाची कार्यवाही

**तपासणी सूची**

| अ.क्रं. | तपशील | वैद्यकिय देयकातील पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| 1 | जे वैद्यकीय देयक सादर केलेले आहे त्या देयकाची मागणी यापुर्वी केलेली नाही असे संबंधित प्राचार्याचे प्रमाणपत्र | |
| 2 | विभागीय सहसंचालक यांची विहीत प्रपत्रातील शिफारस 5 गंभीर किंवा 27 आकस्मिक आजारानुसारच्या नोंदणी नुसार परिगणना तक्ता | |
| 3 | शासनपत्र क्रमांक संकीर्ण/2005/(379/05)/मशि–5,दि.14.02.2005 अन्वये वैद्यकीय प्रतिपुर्तीबाबत मंजूरीसाठी सुधारीत चेकलिस्ट मधिल परिपूर्ण माहीती भरण्यात यावी व त्यावर प्राचार्य व विभागीय सहसंचालक यांची स्वाक्षरी व शिक्का असणे आवश्यक | |
| 4 | जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे प्रमाणपत्र व शासनास रक्कम प्रदान केल्याची पावती जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र, सदर प्रमाणपत्रामध्ये आजाराचे नांव, आजाराचा क्रमांक व सदर आजार 5 गंभीर पैकी आहे की 27 आकस्मिक आजारापैकी आहे याचा उल्लेख असणे आवश्यक आहे. याबाबत सहसंचालक यांनी खात्री करणे आवश्यक आहे. नसल्यास त्याची पुर्तता करून मगच देयक सादर करावे, त्यानुसारच परिगणना करण्यात यावी. | |
| 5 | जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे प्रमाणपत्र व शासनास प्रदान केल्याची पावती जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे प्रमाणपत्रात उपचार करण्यात आलेला आजार कोणता आहे, त्याचे नाव | |
| 6 | कर्मचा–याने महाविद्यालयास सादर केलेला मुळ अर्ज (महाविद्यालयाचा आवक क्रमांक दिनांक असणे आवश्यक) | |
| 7 | मुळ डिसचार्ज कार्ड/डेथ समरी | |
| 8 | शासकीय रूग्णालयाकरीता उपचारासाठी तक्ता अ व ब परिपुर्ण भरलेला आहे का | |
| 9 | वैद्यकीय देयकाच्या कागदपत्रांना पृष्ठक्रमांक देण्यात यावेत. | |
| 10 | पृष्ठक्रमांकानुसार कागदपत्रे देण्यात यावी. | |
| 11 | आंतररूग्ण उपचारासाठी तक्ता क व ड परिपुर्ण भरलेला आहे का. त्यावर डॉक्टरांची सही व शिक्का आहे का, प्राचार्याची सही व शिक्का आहे का. | |
| 12 | तक्ता ड मध्ये नमुद केलेली रक्कम तक्ता क मध्ये भरलेली आहे का याची खात्री करावी. | |
| 13 | अंतीम देयकातील रक्कमेनुसार तक्ता ड भरलेला आहे का, तसेच औषधोपचाराच्या पावत्यांची एकुण रक्कम व अंतीम देयकाच्या रक्कमेची बेरीज करून परिगणना करण्यात आलेली आहे का. | |
| 14 | विहीत प्रपत्रातील रूग्णालयातील वास्तव्याचा दाखला आहे का, त्यात वास्तव्याचा प्रकार, किती दिवस वास्तव्य होते व त्यासाठी आकारण्यात येणारा दर नमुद केला आहे का? त्यानुसार परिगणना करण्यात यावी. | |
| 15 | मुळ अंतीम देयक सादर करण्यात यावे. मूळ अंतरिम देयक सादर करण्यात यावे. | |
| 16 | सदर कर्मचारी सेवानिवृत्त झाला असेल आणि त्यास सेवानिवृत्तीचे वय 60 वरून 62 नुसार मुदतवाढ मिळाली असल्यास तसे प्रस्तावात नमुद करून शासन आदेशाची प्रत जोडावी. | |
| 17 | ॲडव्हान्स भरलेल्या मुळ पावत्या सादर करण्यात याव्यात. | |
| 18 | अंतिम देयकाची मुळ स्टॅप रिसीट सादर करण्यात यावी. | |
| 19 | आंतररूग्ण कालावधीतील औषधोपचाराच्या मुळ पावत्या डॉक्टरचे प्रिस्कीप्शनसह दिनांक निहायसोबत जोडाव्यात. | |
| 20 | आंतररूग्ण कालावधीतील औषधोपचाराच्या पावत्यांची एकूण रक्कमेसह दिनांकानिहाय यादी सोबत जोडण्यात यावी. | |

| | | |
|---|---|---|
| 21 | रू.5000/— रक्कमेच्या पुढील पावत्यांवर रेव्हन्यू स्टॅप आहेत का याची खात्री करावी. | |
| 22 | रूग्णालयाचे ईमर्जन्सी सर्टिफिकेट व औषधांमध्ये अल्कोहोल आणि टॉनिक वापरले नसल्याचे रूग्णालयाचे प्रमाणपत्र | |
| 23 | कर्मचारी महाविद्यालयात 100टक्के अनुदानित पदावर कायम स्वरूपी कार्यरत असल्याचे सहसंचालक व महाविद्यालयाचे प्रमाणपत्र | |
| 24 | महाविद्यालय 100 टक्के अनुदानावर असल्याबाबत सहसंचालक व महाविद्यालयाचे प्रमाणपत्र | |
| 25 | कर्मचा—याचा पगाराचा दाखला वेतनश्रेणीसह, प्राचार्यांच्या स्वाक्षरीने देण्यात यावा. प्राचार्याचे देयक असल्यास संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांनी साक्षांकीत करणे आवष्यक आहे. | |
| 26 | प्राचार्याचे देयक असल्यास आवश्यक सर्व कागदपत्रांवर संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांच्या स्वाक्षरीने देयक सादर करावे व सदर देयक विभागीय सहसंचालक यांनी सांक्षाकित करणे आवश्यक आहे. | |
| 27 | लेखा परिक्षणात त्रूटी आढळल्यास वसुलीच्या रक्कमेचे भरपाई स्वतः करीन असे कर्मचा—याने प्रमाणपत्र देण्यात यावे. | |
| 28 | स्वाक्षांकीत केलेली शिधापत्रीकेची छायांकीत प्रत जोडावी. | |
| 29 | कुटूंब मर्यादित असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यात अपत्यांच्या जन्म दिनांकाची नोंद असणे आवश्यक आहे. | |
| 30 | कर्मचा—यांच्या कुटूंबातील ज्या व्यक्तीवर उपचार करण्यात आले त्याच्या उपचारावरील सर्व खर्च कर्मचा—याने स्वतः केला असल्याचे प्रमाणपत्र. | |
| 31 | अग्रीम घेतले आहे का? अग्रीम घेतले असल्यास 6 महिण्याचे आत देयक सादर केले किंवा नाही,केले नसल्यास अग्रीम आदेषातील अटींनुसार कार्यवाही करून देयक सादर करण्यांत यावे | |
| 32 | ज्या आजारासाठी शासनमान्य रूग्णालयात उपचार घेतले त्याच आजारासाठी रूग्णालयास शासनाची मान्यता आहे काय, मान्यता असल्यास शासन निर्णयाची प्रत सादर करण्यांत यावी व स्वतंत्र शासन निर्णय असल्यास त्याची प्रतही सादर करण्यात यावी. | |
| 33 | कर्मचा—याच्या आई किंवा वडीलांच्या उपचाराचे देयक असल्यास कर्मचा—याचे आई किंवा वडील सेवानिवृत्ती वेतन घेत आहे का? असल्यास त्यांचे सेवानिवृत्ती वेतन किती आहे याची खात्री करून शासन निर्णयातील तरतुदीनुसार देयक सादर केले आहे का? | |
| 34 | शासन निर्णय क्र.एमएजी/1099/प्र.क्र.220/99/आ.3,दि.20.02.2003 व 02.08.2019 मधिल तरतुदीनुसार आई, वडिलांच्या आणि अविवाहीत व घटस्पोटीत बहिणीच्या संदर्भात देयक अनुज्ञेय आहे का याची तपासणी करण्यात यावी व आवश्यक असले तरच सादर करण्यांत यावे. | |
| 35 | आई/वडील सेवा निवृत्ती वेतन घेत असेल तर तसे प्रमाणपत्र. | |
| 36 | पत्नी शासकीय/निमशासकीय सेवेत असल्यास तेथे देयकाची मागणी केली नसल्याबाबत संबंधीत कार्यालयाचे प्रमाणपत्र | |
| 37 | अपघातासंबंधीच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती संदर्भात नुकसान भरपाईचा दावा न्यायालयात प्रलंबित आहे किंवा कसे, असल्यास पोलीस स्टेशन मधिल एफआयआर प्रत (नसल्यास तसेच प्रमाणपत्र जोडावे) | |
| 38 | महाराष्ट् राज्य सेवा(वैद्यकीय देखभाल) नियम 1961 मधिल नियम 11 अन्वये वैद्यकीय प्रतिपूर्ती मिळणेसाठी दावा विहीत कालावधीत केला आहे किंवा कसे, याबाबत संबंधीत कार्यालयाचे प्रमाणपत्र/समर्थन व कर्मचा—याने महाविद्यालयाकडे दिलेल्या पत्राची दिनांकासह प्रत | |
| 39 | छायांकित प्रतितील देयक | |
| 40 | सर्व पावत्यांवर पेड बाय मी म्हणून कर्मचा—याची स्वाक्षरी आवश्यक | |
| 41 | ज्या रूग्णालयात उपचार घेतले आहेत त्या रूग्णालयाचा नोंदणी क्रमांक व शिक्का | |
| 42 | ज्या डॉक्टरांनी उपचार केले आहेत त्या डॉक्टरांचा नोंदणी क्रमांक व शिक्का | |
| 43 | रूग्णास रक्त पुरवठा केला असल्यास शासन निर्णय दि.23.05.1994 नुसार परिगणना करावी. | |
| 44 | मुख्यमंत्री/प्रधानमंत्री निधी, विमा कंपनी किंवा इतर संस्था यांचेकडून आर्थिक सहाय्य/अग्रीम घेतले आहे काय? त्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक. त्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक. | |
| 45 | रूग्ण कर्मचा—यावर अवलंबुन असल्याचे प्रमाणपत्र. | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 46 | नर्सिंगसेवा घेतली असल्यास तसे डॉक्टरचे प्रमाणपत्र जोडलेले आहे का. | | | | | |
| 47 | औषधांचे प्रिस्क्रीप्शन जोडणे आवश्यक आहे. | | | | | |
| 48 | त्रुटींची पुर्तता केल्यावर सदर कागदपत्रे देयकाच्याषेवटी लावून त्यांना पुढील पृष्ठक्रमांक देण्यात यावेत तसेच त्रुटी पुर्तता केलेल्या प्रकरणी पत्रामध्ये संदर्भात सहसंचालक कार्यालयाचा पत्रक्रमांक व दिनांक नमुद करणे आवष्यक आहे. | | | | | |
| 49 | ज्या शासकीय कर्मचा–याला उपचारांसाठी रूग्णालयात दाखल केलेले नसेल, अशा रूग्णांच्या बाबतीत प्रमाणपत्र अ व ब | | | | | |
| 50 | ज्या शासकीय कर्मचा–याला उपचारांसाठी रूग्णालयात दाखल केलेले असेल, अशा रूग्णांच्या बाबतीत प्रमाणपत्र क व ड | | | | | |
| 51 | प्रसुतीमध्ये विहित मुदतीत शासकीय रूग्णालयात नाव नोंदणी केली आहे किंवा कसे विहित नमुन्यातील नाव नोंदणी प्रमाणपत्र. | | | | | |
| 52 | कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आली आहे किंवा कसे, असल्यास प्रमाणपत्र अथवा सेवापुस्तिकातील नोंदीच्या साक्षांकित प्रत. | | | | | |
| 53 | ड तक्त्यात नमुद केलेल्या रक्कमेच्या पावत्यांचा तपशिल पुढील प्रमाणे देण्यात यावा. विवरणपत्रातील बिलांची / प्रमाणकांची एकूण रक्कम ड प्रपत्रातील एकूण रक्कमेशी जुळणे आवश्यक आहे. | | | | | |
| अ.क्रं. | ड तक्त्यातील तपशिल | बिल प्रमाणक क्रं. | दिनांक | रक्कम | पृष्ठक्रमांक | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| 54 | वैद्यकिय प्रस्तावासोबत आयकर नमुना–16 (80डी), जोडावे. | | | | | |
| 55 | कोवीड–19 चे देयक असल्यास वास्तव्याच्या दरात शासन परिपत्रक दिनांक 1 जून 2021 नुसार परिगणना करावी. वास्तव्याचे दर पॅकेजमध्ये असल्यास हॉस्पीटलने प्रमाणीत केलेला पतशील जोडणे आवश्यक आहे. | | | | | |
| 56 | एन्जीओग्राफी, एन्जीओप्लास्टी, कोव्हीड–19, कॅन्सर इ. देयकात वास्तव्याचे दर पॅकेजमध्ये असल्यास हॉस्पीटलने प्रमाणीत केलेला तपशील जोडणे आवश्यक आहे. | | | | | |
| 57 | कर्मचारी / अधिकारी यांचे वडील अथवा आई देयक असल्यास त्यांनी शा.नि.दि.02.08.2019 नूसार आई–वडील यांचे वार्षिक उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक. | | | | | |
| 58 | कर्मचारी / अधिकारी यांचे वडील / आई रूग्ण असल्यास मुळ सेवापुस्तकातील अवलंबिताची नोंदीची प्रत देयकासोबत जोडणे आवश्यक. | | | | | |
| 59 | संबंधित रूग्णता कालावधीत कर्मचारी रजेवर असल्यास / नसल्याबाबत प्राचार्याचे प्रमाणपत्र तसेच सेंवापुस्तकातील रजेच्या नोंदीची प्रत जोडावी. | | | | | |
| 60 | सेवार्थ प्रणालीतील वेतनाची संबंधीत पृष्ठाची प्रत. | | | | | |
| 61 | प्राचार्याचे देयक असल्यास आवश्यक सर्व कागदपत्रांवर संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांच्या स्वाक्षरीने देयक सादर करणे आवश्यक | | | | | |
| 62 | एकाच कर्मचा–याची दोन वेगवेगळया कालावधीची वैद्यकिय देयके असल्यास ती स्वतंत्रपणे सादर करावी. | | | | | |
| 63 | वैद्यकिय प्रतिपुर्ती खर्चाचे देयक रक्कम रू.200000 / – चे आत असल्यास प्रस्ताव एका प्रतीमध्ये व प्रस्ताव रक्कम रू.200000 / – चे वरील रकमेचे असल्यास एक मुळ प्रत व दोन झेरॉक्स प्रती(एकुण 3 प्रती) मध्ये सादर करावे. तसेच प्रस्तावातील कागदपत्रांची स्कॅनींग करून सी.डी. जोडावी. | | | | | |
| 64 | वैद्यकिय देयकातील सर्व प्रमाणपत्रे सत्य व अचूक असल्याबाबतचे रूपये 100 / – चे स्टॅम्प पेपरवर संबंधीत कर्मचारी व प्राचार्य यांचे संयुक्तिक हमीपत्र सादर करणे आवश्यक. | | | | | |
| 65 | प्रस्तावामध्ये सदर तपासणी सुचीनुसार कागदपत्रे लावावी व पृष्ठ क्रमांक देण्यात यावी. | | | | | |